# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ३४६/२०२३ दिनांक ०७/१०/२०२३

**“ Tramadol हा अंमली पदार्थ ज्याला “ISIS Drug” म्हणुन ओळखले जाते. हया अंमली पदार्थाचा साठा हा अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडून नयानगर पोलीस ठाणे हद्दीत Tramadol Hydrochloride SPASMO-PROXYVON PLUS’ या नावाच्या टॅबलेट व्यावसायीक प्रमाणात जवळ बाळगणाऱ्या ईसमांवर कारवाई.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड, काशिमिरा, भाईंदर, नयानगर, नवघर परिसरात अंमली पदार्थ खरेदी विक्री होत असल्याने वरिष्ठांनी सदर ठिकाणी जाउन गस्त करुन गस्ती दरम्यान अंमली पदार्थ खरेदी व विक्री करणारे इसमांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत तोंडी आदेश दिलेले होते त्या अनुषंगाने दि.०५.१०.२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक.अमर मराठे, सपोनि.अमोल आंबवणे, पोलीस अंमलदार पो.हवा.९२००६/इंगळे, पोहवा.०२०१७/पाटील, पोहवा.०३०७५/पागधरे, पोहवा.०७०८८/आव्हाड, असे पोलीस पथक काशिमिरा, हाटकेश, मिरारोड, नयानगर, परिसरात रवाना झाले होते.

गस्ती दरम्यान शांतीनगर, सेक्टर ११, मिरारोड स्टेशन ते एस.के.स्टोन बाजुकडे जाणाऱ्या रोडवर रोडवर एक ईसम त्याचे खांदयावर गडद निळया रंगाची बॅग होती तसेच तो इसम फुटपाथ लगत एका चॉकलेटी रंगाचे ॲक्टीवा जवळ उभा असलेल्या इसमाशी हातवारे करुन बोलत असताना दिसला. ॲक्टीवा गाडीजवळ उभा असलेल्या इसमाचे हातात एक चॉकलेटी रंगाचा बॉक्स असल्याचे दिसले. सदर बॉक्स मध्ये अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

नमुद दोन्ही इसमांची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात **‘Tramadol’** हा अंमली पदार्थ मिश्रीत **Dicyclomine Hydrochloride, Tramadol Hydrochloride & Acetaminophen Capsules SPASMO-PROXYVON PLUS** या नावाच्या ५४६४ टॅबलेट्स एकुण ५,४६,४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन तो पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला आहे. नमुद ईसमाविरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२, २२(क), २९ प्रमाणे नयानगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ाा ५१५/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथकामार्फत चालु आहे.

सदरची कारवाई मा.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोनि.अमर मराठे, सपोनि.अमोल आंबवणे, पोलीस अंमलदार पो.हवा.९२००६/इंगळे, पोहवा.०२०१७/पाटील, पोहवा.०३०७५/पागधरे, पोहवा.०७०८८/आव्हाड यांनी केली आहे.


अमली पदार्थ विरोधी कक्ष
STOP